# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

महाविद्यालयीन शाखा

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविद्रंनाथ टागोर मार्ग, नागपूर–४४० ००१दुरध्वनि क्रमांक ०७१२–२५२९९३२

फॅक्स नं. ०७१२५५५७०१ Email ID : ar-cs@nagpuruniversity.org


क्र.म.वि. 868. C/1893 दिनांकः– ०५/०१/२०१६.

प्रति,

**अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,**
**संस्थेअंतर्गत सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर.**

**विषयः–** ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.

**संदर्भः– क्र.उशिसं/शिष्यवृत्ती/१५–१६/अ.वि.फी.माफी/१२७७५, दिनांक ०८.१२.२०१५**

महोदय,

उपरोक्त संदर्भांकीत पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सन २०१५–१६ च्या खरीप हंगामात जिल्हाधिकारी यांनी ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी घोषित केलेल्या १५७४७ गावांमध्ये दुष्काळग्रस्त परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार सदर १५७४७ गावातील विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क माफ करावयाचे असेल तर शासनावर किती आर्थिक भार येईल याची माहीती शासनास तात्काळ सादर करावयाची असल्याने आपल्या महाविद्यालयाचा समावेश उपरोक्त १५७४७ गावांमध्ये असल्यास गावातील जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांना शिक्षण शुल्क माफ करावयाचे असल्यास किती आर्थिक भार येईल.

याबाबत सोबत जोडलेल्या प्रपत्रात तात्काळ माहीती संचालनालयास सादर करावी. उपरोक्त विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागाकडून शिष्यवृत्ती मिळते किंवा ई.बी.सी. धारक आहेत त्यांना यापूर्वीच शिक्षण शुल्क माफ केले जात असल्याने त्यांचा समावेश आर्थिक भार काढताना करू नये.

आपल्या सुलभ संदर्भाकरिता वरील पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

कळावे.

आपला,

(डॉ. डी.के.अग्रवाल)
संचालक(म.वि.वि.म.),
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर, विद्यापीठ,नागपूर.